# बोरीतील विद्यार्थ्यांना 'सायबर'चे धडे

**आळेफाटा :** आळे (ता. जुन्नर) येथील बी. जे. महाविद्यालयातील क्विक हिल फाउंडेशन यांच्या वतीने बोरी बुद्रूक (ता. जुन्नर) येथे श्री संभाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी सायबर सुरक्षिततेवर माहितीपर व्याख्यानाचे आयोजन केले होते. 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या प्रकल्पांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनी साक्षी नेहरकर, ऋतू नेहरकर यांनी विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा व माहिती तंत्रज्ञान युगात इंटरनेट वापरताना घ्यावयाची काळजी याविषयी माहिती देऊन सायबर जगतात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक बाबींची ओळख करून दिली. तसेच माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईलचा वापर व इंटरनेटचा वापर करताना काय काळजी घेतली पाहिजे, हे देखील त्यांनी उदाहरणासह समजून सांगितले. यावेळी मुख्याध्यापक तानाजी लांडे आदी उपस्थित होते.

Pune, District-Today
30/07/2025 Page No. 9